# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 07/02/2020 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 7 कि. मी. अंतरावर मौजा खरडा येथे दिनांक 31/01/2020 ते दिनांक 06/01/2020 दरम्यान फिर्यादी नामे– धर्मराज देवराव भाजीपाले, वय 48 वर्ष, रा. खरडा हे त्यांच्या परिवारासह पुण्याला गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचे गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केले. तसेच आरोपीने फिर्यादींची एमएच–49/एस– 1914 क्रमांकाची मोटरसायकल कि. 20,000/–रू. ची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभाकर हिंगे 9970264279 हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 06/02/2020 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. जयश्री संगीता गुरूशर्मा तुतीयापंथी, वय 40 वर्ष, रा. 14 मैल या 14 मैल येथे टोल टॅक्स नाक्या जवळ पैसे मागत होत्या. दरम्यान आरोपी नामे– दामिनी भुरी साक्षी शहा, रा. मरीयम नगर, नागपूर हिने ''तु कशाला पैसे मागते ही माझी पैसे मागण्याची जागा आहे. या कारणावरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून कशाने तरी कपाळावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सपाटे 9823998476 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 16 कि. मी. अंतरावर गोंडखैरी दिनांक 06/02/2020 चे 10.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दामिनी साक्षी शहा, वय 32 वर्ष, रा. मरीयम नगर, सिव्हील लाईन्स नागपूर या गौंडखैरी टोल नाक्या जवळ येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांकडून पैसे मागत असतांना आरोपी नामे– क्र. 1) जयश्री संगीता गुरूशर्मा तुतीयपंथी, वय 40 वर्ष, रा. 14 मैल व 2) भाग्यश्री तुतीयपंथी, दोन्ही रा. 14 मैल यांनी फिर्यादीस म्हटले की, ''तु ईथे कशी काय पैसे मागते? या जागेवर आमचा अधीकार आहे. तु येथून लवकर नीघून जा.'' असे म्हणुन शिवीगाळ करून आरोपीतांनी फिर्यादीच्या डाव्या हाताच्या अंगठाजवळील बोटाला चावा घेतला व नखाने तोंडावर ओठावर ओरपले व हातबुक्कीने मारहाण केली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला मारून टाकण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सपाटे 9823998476 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर आयसीसी बॅक काटोल येथे दिनांक 01/10/2019 ते दिनांक 31/01/2020 चे 10.00 वा. 00.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलकंठ बळीरामजी कळंबे, वय 49 वर्ष, रा. बालाजी नगर, प्लॉट क्र. 13, अजनी नागपुर यांना आरोपी नामे– पंकज गोस्वामी, रा. बंगलोर याने रिलायन्स जिओ कंपनी मध्ये असल्याचे सांगुन माहे ऑक्टोबर 2019 मध्ये फोन करून म्हटले की, ''तुमच्या शेतात जिओ कंपनीची डिजीटल टॉवर लावुन देतो'' त्याकरीता आरोपीने फिर्यादीला 10 लाख रूपये देण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी कडुन 73,030/–रू. घेवुन आरोपी नामे– पंकज गोस्वामी यांच्या खात्यात टाकण्यास भाग पाडुन फसवणुक केली आहे. तसेच फिर्यादी माहे जानेवारी 2020 पर्यंत आरोपीला फोन करीत होते परंतु त्याने फिर्यादीला कोणतेही प्रतिसाद दिले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि अश्विनी वानखेडे 8888110877 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर